# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@gmail.com Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/२०१६/ ९४९२
दिनांक : 20 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमास Diploma in Architectural Assitantship उमेदवारांना गणित विषयाची परीक्षा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडे अर्ज सादर करण्याबाबत...

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश नियम शासन राजपत्र असाधारण क्रमांक ७४ दिनांक ११.३.२०१६ अन्वये प्रसिध्द केलेले होते. त्यानुसार प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी उमेदवारांनी इयत्ता १२ वी किंवा पदविका अभ्यासक्रम गणित विषयासह किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक होते.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रम Diploma in Architectural Assitantship हा अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवारांना अभ्यासक्रमामध्ये Mathematics विषयाचा समावेश नसल्यामुळे प्रवेशाचा प्रश्न उपस्थित झाला होता. हा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनी वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र करण्याची विनंती निवेदनाद्वारे केल्यानंतर या उमेदवारांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून त्यांना प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी तात्पुरता प्रवेश देऊन पदविका अभ्यासक्रमामधील मॅथेमॅटिक्स या विषयाची परीक्षा सहा महिन्यांच्या कालावधीत घेणे उत्तीर्ण करण्याच्या अधीन राहून त्यांना प्रवेशास पात्र करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या उमेदवारांनी पदविका उत्तीर्ण होऊन प्रवेश घेतला होता त्या उमेदवारांची यादी सोबत जोडण्यात येत आहे. या यादीमधील जे उमेदवार Diploma in Architectural Assitantship हा अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित आहेत त्याची माहिती संस्थांनी घेऊन त्या उमेदवारांची माहिती महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि संचालनालयास दिनांक २०.१०.२०१६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

शैक्षणिक
आ. दा. कारेना
D:\Budage\२०१६-१७\Architecutre\Exam for AA students.docx
20/10

शासनाच्या प्रवेश अर्हतेनुसार पात्र ठरण्यासाठी Diploma in Architectural Assitantship हा अभ्यासक्रम उत्तीर्ण उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडे मॅथेमॅटिक्स विषयाची परीक्षेस बसण्यासाठी अर्ज करण्याबाबत त्यांना कळविणे आवश्यक आहे. त्यासाठी सोबतच्या यादीतील आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या ज्या संस्थांमध्ये सदरहू उमेदवार आहेत अशा उमेदवारांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा परीक्षा अर्ज भरण्याबाबत कळविण्यात यावे.

प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्हतेनुसार मॅथेमॅटिक्स विषयात उत्तीर्ण असणे अनिवार्य असल्यामुळे सदर बाब गंभीरपणे घेण्याबाबत आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून घेण्यात येणा-या हिवाळी परीक्षा २०१६ मध्ये G Scheme मधील Basic Mathematics (१७१०४) या विषयाची परीक्षा देणे आवश्यक असल्याचे मंडळाने मरातंशिमं/का-५०/वास्तुशास्त्र/२०१६/६८११, दिनांक १८.१०.२०१६ अन्वये संचालनालयास कळविले आहे. (सोबत प्रत जोडली आहे) . सदर परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास शैक्षणिक अर्हता पूर्ण नसल्यास्तव त्यांचा प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचा प्रवेश पुढे सुरू ठेवता येणार नाही ही बाबही या विद्यार्थ्यांच्या आणि संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावी. तसेच या विद्यार्थ्यांबाबत तंत्रशिक्षण मंडळाने मागितलेली माहिती तात्काळ मंडळास सादर करण्याबाबत सर्व संस्थांना आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत :--
मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ व मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रत :माहितीसाठी ---
१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई
२. कार्यासन क्रमांक ३(माहिती तंत्रज्ञान कक्ष),मुख्य कार्यालय,मुंबई

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/६५५
दिनांक :- 20 OCT 2016

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या वास्तुशास्त्र पदविका अभ्यासक्रमास Diploma in Architectural Assitantship उमेदवारांना गणित विषयाची परीक्षा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून कळविण्यात आलेले असून प्रवेशीत उमेदवारां पैकी किती विद्यार्थ्यांनी मॅथेमॅटिक्स विषयाच्या परीक्षेस बसण्यासाठी अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची माहिती तात्काळ आज ५.०० पर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.